# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा.क्र.  255/2023   दिनांक : 01.07.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :-

**सोनखेड :-**दिनांक 22.06.2023 रोजी ते दि. 29.06.2023 राजी चे 14.40 वा. चे दरम्यान, **गिटटी क्रेशर समोर सार्वजनिक रोडवर मौ. ढाकणी ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून मोबाईल वरून फिर्यादीचे व्हॉटअपवर फोनवर मै रिंधा बात कररहा हुँ असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी देवुन एक करोड रूपयाची खंडणीची सतत मागणी करत होते. फिर्यादीने तडजोड करून दोन लाख रूपये देतो असे म्हणुन उर्वरीत रक्कम टप्याटप्याने पैसे देतो असे सांगीतले. दिनांक 29.06.2023 रोजी 11.52 वा. चे सुमारास परत खंडणी मागणाऱ्याचा व्हॉईस कॉल आल्याने व पैसे आजच दुपारी साडेबारा वाजता आणुन दे असे सांगितल्याने फिर्यादीचे जिवाला धाका असल्याने त्याबाबतची तक्रार श्री सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर यांचेकडे केली. सदर तक्रारीवरून मा. गुरव साहेबांनी, पोलीस पथकाला योग्य त्या सुचना देवुन गिटटी क्रेशर ढाकणी येथे पाठवले. त्यानंतर आरोपीतांनी फिर्यादीस आम्ही गिटटी क्रेशर जवळ येणार नाही तु क्रेशर समोरील रोडवर ये असे म्हणाल्याने फिर्यादी त्यांची हुंडाई कार क्रमांक एमएच-26/सीई-8800 मध्ये पैसे घेवुन क्रेशर समोरील रोडवर आला असता सदर ठिकाणी टाटा हॅरीयर क्रमांक एमएच-26/बीएक्स-8710 ही कार फिर्यादीचे कारचे जवळ उभी राहीली. सदर कारमध्ये आरोपी क्रं 1 होता. व त्याचे मागेच मो सा वर आरोपी क्रमांक 2 व 3 हे आले तेंव्हा आरोपी क्रं 1 याने सदर रक्कम आरोपी क्रं 2 यांचेकडे देण्यास सांगीतले तेव्हा पोलीसांनी सदर आरोपीतांना पकडण्याचा प्रयत्न करीत असतांना आरोपी क्रं. 1 यांनी पोलीसाचे दिशेने फायर केला. तेंव्हा पोलीसांनी सुध्दा प्रतिउत्तर म्हणुन गाडीचे दिशेने फायर केला व झटापट करून नमुद आरोपीतांना पोलीसांनी ताब्यात घेतले. तरी नमुद आरोपीतांनी फर्यादी कडुन खंडणीची रक्कम वसुल करून पोलीसांनी पकडण्याचा प्रयत्न करीत असतांना आरोपी क्र 1 याने त्याचे कडील पिस्टलने पोलीसांचे दिशेने फायर करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी तेजस हरीकिशेन लोहीया, वय 40 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. बजाज हॉस्पीटलच्या पाठीमागे मुथा कंपाऊंड वजिराबाद नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरन 81/**2023 कलम** 307,384,385, 386, 387, 507, 34, भादवि सह कलम 3/25, 27, भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री परिहार, मो. नं. 9823372495** हे करीत आहेत.

## 2)विवाहीतेचा छळ :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक 14.08.2017 ते दि. 27.12.2021 चे 13.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी गाजुपेठ जि. निजामाबाद ह. मु. भावेश्वरनगर ब्रम्हपुरी नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तिचे सासरचे लोकांनी उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ करून मारहाण करून तुझे माहेरहुन मो सा घेण्यासाठी दिड लाख रूपये घेवुन ये म्हणुन व फिर्यादी गरोदर असतांना फिर्यादीस घराबाहेर हाकलुन दिले. पैसे घेवुन आली नाहीस तर तुला खत्तम करतो असी जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 28 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 481/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/616 चक्रधर, मो.क्रं. 7020448411** हे करीत आहेत.

## 3)प्राणी संरक्षण अधिनियम :-

**इतवारा :-**दिनांक 30.06.2023 रोजी चे 18.40 वा. चे सुमारास, **उमर कॉलणी देगलुर नाका नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिरित्या कत्तल करण्याच्या उद्देशाने एक बैल किंमती 17,000/-रूपयाचा ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/रहीम बशीर चौधरी, ने. पोस्टे इतवारा** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा गुरन 196/2023** कलम 5, 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/108 गुटटे, मो. नं. 9637266983** हे करीत आहेत.

## 4)भारतीय हत्यार कायदा :-

**1)शिवाजीनगर :-**दिनांक 29.06.2022 रोजी चे 21.00 वा. चे सुमारास, **गोकुळनगर येथील पाण्याचे टाकीसमोर सार्वजनिक रोडवर नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक धारधार लोखंडी खंजर बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/मिलींद मधुकर सोनकांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 204/2023 कलम 34 भादवि सह कलम 4/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1130 आर बी गुटूलवाड, मो.क्र. 7744071130** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–**दिनांक 29.06.2022 रोजी चे 23.10 वा. चे सुमारास, **बाबानगर चौकात सार्वजनिक रोडवर नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी पिस्टल किंमती 22,000/–रूपयाचे ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/मिलींद मधुकर सोनकांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 205/2023 कलम 3/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/माने, मो.क्र. 9403546846** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा.क्र.  256 / 2023        दिनांक : 01.07.2023

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"वसंतराव नाईक"** यांची जयंती साजरी केली.

01 जुलै, 2023 शनिवार रोजी **"वसंतराव नाईक"** यांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्री.श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड तसेच पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, सपोउिपनि / सुर्यभान कागणे, पोकॉ / विनांदे भंडारे यांनी उत्तम प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

